25 JAN 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाराणी ताराराणींच्या जीवनावर टीव्ही मालिका करणार

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर : डॉ. जयसिंगराव पवार लिखित 'मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई' या ग्रंथाचे खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते प्रकाशन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

करवीर संस्थापिका महाराणी ताराराणी यांचे जीवन व त्यांनी मोगलांशी दिलेला लढा समाजाला सतत प्रेरणा देत राहिल असाच आहे. या प्रेरणेचे एक अढळ स्थान असावे म्हणून ताराराणींनी ज्या पन्हाळगडावरुन राज्य चालवले त्या पन्हाळगडावर राज्य शासनाच्या माध्यमातून त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारला जाईल. तसेच त्यांची प्रेरणा घराघरात जावी या भावनेने ताराराणींच्या जीवनावर टीव्ही मालिकाही सुरु करावी लागले. या मालिकेला शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी हमी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शुक्रवारी येथे दिली.



कोल्हापूर : डॉ. जयसिंगराव पवार लिखीत 'मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई' या ग्रंथाच्या प्रकाशन करताना खासदार श्रीमंत शाहू छत्रपती व सुप्रिया सुळे. डावीकडून सुरेश शिपूरकर, मालोजीराजे छत्रपती, कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, धनंजय महाडिक, हसन मुश्रीफ, प्रकाश आबिटकर, डॉ. जयसिंगराव पवार, धैर्यशील माने, संभाजीराजे छत्रपती, डॉ. मंजुश्री पवार, ॲड. राजेंद्र चव्हाण आदी.

शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट–नवीन राजवाडा व महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी–कोल्हापूर यांच्या वतीने ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखीत 'मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई' या पहिल्या व संशोधनात्मक चरित्र ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. राजघराण्याच्या पुढाकारातून नवीन राजवाड्याच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमाला शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्टचे अध्यक्ष खासदार श्रीमंत शाहू छत्रपती, खासदार सुप्रिया सुळे, खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, माजी आमदार मालोजीराजे छत्रपती, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, यांच्यासह राजकीय पक्षांचे नेते उपस्थित होते. त्यांच्यासमोर खासदार शाहू छत्रपती व खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते चरित्र ग्रंथाचे प्रकाशन केले.

दरम्यान, प्रकाशनापूर्वी छत्रपती शाहू विद्यालयातील तारा कमांडो फोर्समधील मुलींनी महाराणी ताराराणींवर आधारीत 'स्वराज्य तेज योगिनी...झळाळली रणांगणी' हे गीत सादर केले. शाहीर आझाद नायकवडी यांनी ताराराणींचा पराक्रम सांगणारा पोवाडा म्हटला. इतिहास संशोधक डॉ. मंजुश्री पवार यांनी प्रास्ताविक केले.

### ताराराणीवरील चरीत्र ग्रंथ लिहिण्यासाठी मिशनच हाती घेतले : डॉ. पवार

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु (कै.) डॉ. अप्पासाहेब पवार यांनी ६० वर्षापूर्वी माझ्या हातात इतिहासाची जुनी कागदपत्रे ठेवून इतिहास संशोधक होण्याचा मार्ग दाखवला, असे सांगून महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीचे संस्थापक संचालक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, ताराराणींच्या चरित्रावर ग्रंथ लिहिण्याचे मिशन पन्नास वर्षापूर्वी हाती घेतले होते. ताराराणी यांनी औरंगजेबाविरुद्ध ७ वर्षे लढा दिला. हा मुद्दा घेऊन जर्मन इतिहास संशोधकाशी चर्चा करताना ताराराणींशी तुलना करावी, अशी जगाच्या इतिहासात दुसरी महिला आहे का असे विचारले. त्यावर त्या जर्मन संशोधकाने सांगितले की, जगाच्या इतिहासात जुलमी सत्तेशी ७ वर्षे लढलेली एकही महिला नाही, असे सांगितले. ज्या पन्हाळगडावरुन ताराराणींनी राज्य केले त्या पन्हाळगडावरच त्यांचा पुतळा असावा एवढीच माझी अपेक्षा आहे.

मुश्रीफ म्हणाले, औरंगजेबविरोधात महाराणी ताराराणी यांनी जिकरीने दिलेला लढा हा महाराष्ट्रासाठी फार महत्वाचा ठरला. त्याची जाणिव ठेवत आबिटकर यांच्याशी चर्चा करुन पन्हाळगडावर पुतळ्यासंदर्भात पुढील कार्यवाहीही केली जाईल. तसेच पन्हाळगडावर लवकरच शिवरायांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येईल. नगरपरिषदेला ३ कोटी रुपयांचा निधीही दिला आहे.

सुळे म्हणाल्या, सध्या आर्कालॉजिकल डिपार्टमेंट ऑफ इंडिया देशाचा इतिहास लिहित आहे. परंतु त्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दुसरीकडे जगभरातील इतिहासकार भारताच्या इतिहास हस्तक्षेप करताहेत. अशा परिस्थितीत आर्कालॉजिकल डिपार्टमेंट व बाहेरील इतिहासकारांकडून लिहिला जाणारा इतिहास हा खरा आहे हे पहावे लागेल. पाठ्पुस्तकांमध्येही ताराराणी यांच्यासारख्या लढवय्यांचा इतिहास आणावा लागेल, असेही त्यांनीसांगितले.

यावेळी याज्ञसेनी महाराणी, संयोगिताराजे छत्रपती, मधुरिमाराजे छत्रपती, शहाजीराजे छत्रपती, यशराजराजे छत्रपती, शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्टचे विश्वस्त ॲड. राजेंद्र चव्हाण, समरजित घाटगे यांच्यासह करवीर संस्थानातील जहागीरदार, सरदार, सरकार व मानकऱ्यांच्या घराण्यातील वारसदार उपस्थित होते. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. सामाजिक कार्यकर्ते व महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष सुरेश शिपूरकर यांनी आभार मानले.

### ताराराणींच्या लढ्यामुळे महाराष्ट्र शत्रूपासून मोकळा झाला : खासदार शाहू छत्रपती

खासदार शाहू छत्रपती म्हणाले, ताराराणींच्या लढ्यातून महाराष्ट्राबरोबरच देशाला वेगळी स्फुर्ती घेता येणार आहे. शिवाय त्यांच्या औरंगजेबाशी दिलेल्या लढ्याने महाराष्ट्राला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाला ताराराणी यांचा इतिहास नवी दिशासुद्धा देत राहिल, असाच आहे, असेही शाहू छत्रपती म्हणाले.

### म्हणून पक्ष फुटला... आणि हशा पिकला...

सुप्रिया सुळे यांनी भाषणात समय सुचकता दाखवत चिमटे काढले. त्या म्हणाल्या, एक पक्ष वेळ देत नाही म्हणून फुटला आणि आमचा पक्ष जास्ती वेळ देतो म्हणून फुटला असा सांगताच, उपस्थित हसन मुश्रीफ, प्रकाश आबिटकर, धनंजय महाडिक, धैर्यशील माने यांच्यासह उपस्थित सर्वांमध्ये हशा पिकला. पक्षातून नेते मंडळी जरी बाहेर गेली असली तरी त्यांच्याशी आपुलकीचे नाते ठेवणार. ही शिकवण मला खुद्द राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी दिली आहे. आरेला का रे म्हणत बसले असते तर मी खासदार झाले नसते असेही त्या म्हणाल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 JAN 2025

सकाळ



कोल्हापूर : ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित 'मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई' चरित्र ग्रंथाचे प्रकाशन करताना खासदार सुप्रिया सुळे. शेजारी खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, सुरेश शिपूरकर, मालोजीराजे छत्रपती, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, खासदार धनंजय महाडिक, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, प्रा. डॉ. जयसिंगराव पवार, खासदार धैर्यशील माने, युवराज संभाजीराजे छत्रपती, डॉ. मंजूश्री पवार, ॲड. रणजित चव्हाण. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा )

# इतिहास सोयीने नव्हे, सत्यावर लिहावा

## खासदार सुप्रिया सुळे : 'मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई' ग्रंथाचे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : 'इतिहास सोयीप्रमाणे नव्हे, तर सत्यावर आधारित लिहावा लागतो', असे प्रतिपादन खासदार सुप्रिया सुळे यांनी आज येथे केले. महाराणी ताराबाई यांचा शौर्याचा इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा, अशी मागणी करत भारतीय पुरातत्त्व विभागाकडून इतिहास बदलला जातोय का, असा मनात प्रश्न निर्माण होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट व महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीतर्फे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित 'मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई' चरित्रग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी त्या बोलत होत्या. त्यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन झाले. यावेळी खासदार शाहू महाराज यांच्या हस्ते डॉ. पवार व सुळे यांचा शाल, श्रीफळ व महाराणी ताराबाईंची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. दरम्यान, तारा कमांडो फोर्सच्या विद्यार्थिनींनी ताराबाई यांच्यावरील गीत सादर केले, तर शाहीर आझाद नायकवडी यांनी पोवाडा सादर केला. न्यू पॅलेसच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला.

खासदार सुळे म्हणाल्या, 'महाराणी ताराबाईंनी केलेल्या संघर्षामागे नैतिकता होती. माणुसकी व शौर्य यांचा मिलाफ होता. परिणामांचा विचार न करता लढायला नैतिकता लागते. बीड, परभणीमधील घटनांमध्ये आपण गप्प बसलो तर गुन्हेगार ठरू शकतो. चुकीच्या पद्धतीने कोणी देश चालविणार असेल तर दडपशाहीच्या विरोधात लढा द्यावा लागेल. लोकप्रतिनिधी म्हणून नेतृत्व करणे ही जबाबदारी आहे. एक चूकही परवडणारी नसते. देश संविधानावर चालतो. कोणाच्या मनमर्जीने चालत नाही. तसा चालविण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्यासाठी किंमत मोजू. मात्र, देश संविधानावर चालेल.'

खासदार शाहू महाराज म्हणाले, 'अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान असताना गुजरातमध्ये भूकंप झाल्यानंतर आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर सोपवली होती. महाराष्ट्राचा विकासाचा पॅटर्न आहे. तो देशभर चालला पाहिजे. सुप्रिया सुळे या योद्ध्याच्या कन्या आहेत.'

### म्हणून पक्ष फुटला...

■ 'पालकमंत्री आबिटकर, तुमच्या नेतृत्वाने जास्त वेळ दिला नाही म्हणून, तर आमचे नेतृत्व जास्त वेळ देते म्हणून पक्ष फुटला, अशी टिप्पणी सुळे यांनी केली. 'कोल्हापूरशी जिव्हाळ्याचा ऋणानुबंध असून, निवृत्तीनंतर कोल्हापुरात घर घेऊन येथेच राहावे, अशी वडिलांची इच्छा होती. ते कमी बोलतात. संसदेत बोलताना एखादी चूक झाली की, घरात पाऊल टाकायच्या आधीच चुकीवर बोट ठेवतात', असेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, 'महाराणी ताराबाई यांचा इतिहास लोकांसमोर यावा, यासाठी मालिका सुरू करण्यासाठी पुढाकार घेऊ.'

वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, 'पन्हाळ्यावर महाराणी ताराराणींचा पुतळा उभा करण्याचे काम लवकरच सुरू करू. पंचायत समितीच्या परिसरात शिवरायांचा अर्धपुतळा आहे. तो पूर्णाकृती असावा, यासाठी तीन कोटी रुपयांचा निधी पन्हाळा नगरपालिकेला दिला आहे.'

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, 'साताऱ्याच्या गादीची प्रतिमा ताराबाईंनी उंचावली. त्यांच्यावर लिहिण्याचे मिशन पन्नास वर्षांपूर्वी ठरवले होते. राजर्षी शाहूंवर दोन हजार पानांचा ग्रंथ लिहिला. त्यांच्यावर अनेकांनी ग्रंथ लिहिले. उपेक्षित राहिलेल्या ताराबाईंवर चरित्रग्रंथ लिहिल्याने आजचा दिवस माझ्यासाठी भाग्याचा आहे. त्यामागे माझे गुरू शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची प्रेरणा आहे.'

यापसंगी खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, युवराज संभाजीराजे छत्रपती, युवराज्ञी संयोगितराजे छत्रपती, मालोजीराजे छत्रपती, मधुरिमाराजे छत्रपती, ॲड. राजेंद्र चव्हाण उपस्थित होते. डॉ. मंजूश्री पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रबोधिनीचे अध्यक्ष सुरेश शिपूरकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2025
तरुण भारत

# सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरेंना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, डॉ.तानाजी चौगुले, डॉ.सागर डेळेकर, डॉ.रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव डॉ.प्रमोद पांडव, डॉ.के.वाय.राजपुरे, डॉ. अण्णासाहेब मोहोळकर, डॉ.मानसिंग टाकळे, डॉ.राजीव व्हटकर, डॉ. कविता ओझा, डॉ.उर्मिला पोळ यांचेसह शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2025
पुण्यनगरी



## शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर :** नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये गुरुवारी सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. अण्णासाहेब मोहोळकर, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. राजीव व्हटकर, डॉ. कविता ओझा, डॉ. उर्मिला पोळ यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2025
पुढारी

# विद्यापीठात २९ जानेवारीला मराठी विभागातर्फे परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाच्यावतीने बुधवार (दि. २९) रोजी ममराठी भाषेच्या उत्पत्तीविषयक सिद्धांतांची पुनर्मीमांसाफया महत्त्वाच्या विषयावर एकदिवसीय परिसंवादाचे आयोजित करण्यात आले आहे. कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के यांच्याहस्ते परिसंवादाचे उद्‌घाटन होणार आहे. प्र-कुलगुरु डॉ.पी.एस.पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. भारतीय संस्कृती, सभ्यता आणि भाषांचे अभ्यासक रवींद्र इंगळे-चावरेकर (बुलडाणा) बीजभाषण करणार आहेत. भाषाभ्यासक प्रा. दिलीप चव्हाण (नांदेड) व जैन आणि प्राकृत साहित्याचे अभ्यासक प्रा. गोमटेश्वर पाटील (कोल्हापूर) मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2025
लोकमत

# मराठी विभागातर्फे बुधवारी परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे बुधवारी 'मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयक सिद्धांतांची पुनर्मीमांसा' या विषयावर एकदिवसीय परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. या चर्चेत भारतीय संस्कृती, सभ्यता आणि भाषांचे अभ्यासक रवींद्र इंगळे-चावरेकर (बुलडाणा), भाषा अभ्यासक प्रा. दिलीप चव्हाण (नांदेड), जैन आणि प्राकृत साहित्याचे अभ्यासक प्रा. गोमटेश्वर पाटील (कोल्हापूर) हे सहभागी होणार आहेत. मराठी भाषा विभागात सकाळी ११ वाजता हा परिसंवाद होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2025
लोकमत

# न्यू कॉलेजमध्ये 'न्यू होरायझन' स्पर्धा

**कोल्हापूर :** येथील श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजमध्ये ३१ जानेवारीला न्यू होरायझन २ के २५ या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन केले आहे. पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन, प्रोग्रामिंग स्कील टेस्ट स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेचे हे २० वे वर्ष असून यामध्ये शिवाजी विद्यापीठ व पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. थायलंडचे व्यापार सल्लागार डॉ. चेतन नरके यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन होईल. संस्थेचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील अध्यक्षस्थानी असतील. या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2025
पुढारी



# शिवाजी विद्यापीठाकडून ३९० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाकडून हिवाळी सत्रातील आजअखेर ३९० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी बी.कॉम., बी.एस्सी., एमबीए., डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल हेल्थ अँड एन्व्हायर्न्मेंट, डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी यासह ३५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध ३२ केंद्रांवर सुरळीत पार पडल्या. परीक्षेला ३ हजार १५ विद्यार्थी उपस्थित होते. दि. २४ रोजी एम.ए. (संस्कृत), बी. फार्मसी, एम.एस्सी. (डाटा सायन्स), एम.एस्सी. (अ‍ॅग्रोकेमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट) या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची नोंद करण्यात आली आहे.

25 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माळ्यांच्या मदतीने बहरल्या बागा

## शहर-जिल्ह्यात सेंद्रिय बागांना प्राधान्य; किचन गार्डनसह नवनवीन प्रयोगांकडे कल

**कोल्हापूर : परसबागेत फळबागा आणि त्याचे व्यवस्थापन माळी व घरचे मालक यांच्या समन्वयामुळे घरच्या घरी भाजीपाला पिकविणाऱ्या कुटुंबाची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विषमुक्त भाज्या घरीच पिकविण्यासाठी व्हॉटस ग्रुपच्या माध्यमातून चळवळ उभारली आहे. कधी कधी छोट्या-छोट्या गोष्टी पटकन लक्षात येत नाहीत, अशावेळी माळी नेमून बागेची देखभाल केली जाते. मोठ्या कंपन्यांमध्ये कायमस्वरूपी बागेची देखभाल करण्यासाठी नोकरी करण्यापेक्षा एकाचवेळी पाच ते सहा बागा घेऊन त्याची देखभाल करत माळी काम करणाऱ्यांनीही 'करिअर'मध्ये बदल केला आहे.**



कोल्हापूर : शहरात विविध ठिकाणी माळ्यांच्या मदतीने बाग आणखी कशी सुंदर बनविता येते यावर भर दिला जात आहे.

बिग स्टोरी

**बी. डी. चेचर**

**■ पाचशेहून अधिक बागप्रेमींनी केला स्वतःचा व्यवसाय सुरू**

कोल्हापूर गार्डन क्लब शहर-जिल्हा परिसरातील शेतकरी आणि माळी यांना शिवाजी विद्यापीठाच्या निरंतर विस्तार विभागाच्या मदतीने प्रशिक्षण देण्याचे काम करत आहे. चार वर्षांत ऑनलाईन आणि ऑफलाईन माळी कामाचे प्रशिक्षण घेत पाचशेहून अधिक बागप्रेमींनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. पारंपरिक बाग कामात काही प्रमाणात त्या कामाचे स्वरूप बदलत आहे. प्रामुख्याने आता सगळीकडे किचन गार्डनचा ट्रेंड असून त्या ठिकाणी अनेक क्रिएटिव्ह रचना साकारतात. सध्या औषधी वनस्पतींचे झाडे संगोपनही शास्त्रोक्त पद्धतीने केले जात आहे.

**■ शिवाजी विद्यापीठाकडून प्रशिक्षण**

बागकाम आणि किचन गार्डनमध्ये कोरोनानंतर मोठे बदल झाले. घरातील छोटी बाग असो किंवा मोठ्या कंपन्यांची मोठी बाग. त्यांची देखभाल करण्यासाठी विशेषतः महिला वर्ग अशा प्रकारच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेत आहे. छोट्या शेतकऱ्यांसाठी शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या आजीवन व विस्तार विभागाच्यावतीने पाण्यावरच्या शेतीचेही धडे देण्याचाही मानस आहे. शहरातील माळी आणि छोट्या शेतकऱ्यांना घरच्या घरी कशी भाजी पिकवू शकू यासाठी आठवीपासून दहावीपर्यंत आठवड्यातून दोन दिवस असे चार महिने प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणात सुमारे पाचशे माळी रोपवाटिका प्रशिक्षण घेऊन घरच्या आणि कंपन्यांच्या बागांसाठी काम करत आहेत.

> “ सरकारी उद्यानात जे माळी निवृत्त झाले आहेत त्या जागी नवीन भरती नाही. आठ तास काम करून व्यवस्थित मानधन मिळत नाही. मानधन नसल्यासारखीच अवस्था असते. यामुळे माळी काम करणाऱ्यांनी कामाचे स्वरूप बदलले आहे.
>
> **- सुभाष कांबळे**, माळी कामगार

> “ शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत सुरू असलेल्या उद्यान प्रशिक्षणात कोल्हापूर गार्डन क्लब हे अनेकांना प्रोत्साहन म्हणून काम करत आहे. दरवर्षी दोन ते तीन माळींचे शिक्षण पूर्णपणे मोफत करून देण्याचे काम गार्डन क्लब करत आहे. त्याबरोबर नवीन प्रयोग आणि घरच्या घरी भाजी कशी पिकवायची, याचे प्रशिक्षण गार्डन क्लब देत आहे.
>
> **- प्रमिला बत्तासे**, गार्डन क्लब

> “ बदल हा नैसर्गिक आहे. त्यानुसार अभ्यासक्रमातही बदल करणे गरजेचे असल्याने भविष्यातील विचारानुसार शेतीविषयक नावीन्यपूर्ण बदल करीत आहोत. त्यापैकी एक म्हणजे पाण्यावरच्या शेतीच्या प्रयोगाकडे वाटचाल सध्या सुरू आहे.
>
> **- आर. जी. पवार**, आजीवन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2025
पुढारी

# मास कम्युनिकेशनच्या माजी विद्यार्थ्यांचा आज मेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शनिवारी (दि. २५) आयोजित केला आहे. एम. ए. मास कम्युनिकेशन कोर्स २००५ ला सुरू झाला आहे. दरम्यानच्या काळात कोर्सचे विद्यार्थी अनेक महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांचे संघटन करण्याचा व त्यातून विभागात काही सकारात्मक उपक्रम राबविण्याचा मास कम्युनिकेशन विभागाचा मानस आहे. मेळाव्याला माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.